# रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी

प्रधान कार्यालय, रत्नागिरी

## जाहिरात

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरीचे आस्थापनेतील सरळ सेवा भरतीने अधिकारी, लिपिक व शिपाई यांची रिक्त पदे भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदांची संख्या, वेतनश्रेणी, आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता, इतर अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, अर्ज करण्याची पद्धती, परिक्षा शुल्क भरण्याची पद्धत, अर्ज भरण्याची / स्वीकारण्याची तारीख / कॉल लेटर उपलब्धी, परिक्षेची तारीख व तत्सम महत्वाच्या सूचना तसेच संपूर्ण जाहिरात ratnagiridccbank.com किंवा ratnagiridccbank.in या बँकेच्या वेबसाईट वर पाहावयास मिळेल.

बँकेच्या नोकरभरती संबंधातील पदांची संख्या, अटी व नियमांबाबत परिस्थितीनुसार फेरबदल करण्याचा अधिकार बँकेस राहील.

दिनांक : 01/08/2024

सही/-

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,**
**रत्नागिरी**

# रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी

**"सहकार भवन", जवाहर पथ, रत्नागिरी. पिन -४१५६१२.**

---

## नोकरभरतीची विस्तृत जाहीरात

**रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी** या बँकेकरीता विविध श्रेणीतील रिक्त १७९ पदे सरळसेवा भरतीव्दारे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून निवड सुची तयार करणेसाठी विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यांत येत आहेत. बँकेचे संकेत स्थळ ratnagiridccbank.com किंवा ratnagiridccbank.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | संकेत स्थळावर अर्ज भरणे | ०१/०८/२०२४ ते ०९/०८/२०२४ |
| 2 | ऑनलाईन परिक्षा शुल्क रोखीने स्विकारण्याचा अंतिम दिनांक | ०९/०८/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत |
| 3 | ऑनलाईन परीक्षा शुल्क रोखीने स्वीकारलेनंतर ट्रान्झेकशन आयडी संकेत स्थळावर अद्यावत (Update) करण्याची अंतिम दिनांक | ०१/०८/२०२४ ते १०/०८/२०२४ (दि. १०/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) |
| 4 | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रकशित करण्यात येईल. |
| 5 | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यांचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रकशित करण्यात येईल. |
| 6 | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रकशित करण्यात येईल. |

***सूचना***

1. परिक्षा शुल्क संकेत स्थळावर अद्यावत (Update) केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पुर्ण होणार नाही.

2. उमेदवारांना परिक्षा शुल्काची रक्कम **रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी** बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये रोखीने भरणा करता येईल.

3. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत: चा ईमेल-आयडी मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.

4. संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरते वेळी, अर्ज भरण्यास तांत्रिक अडचण आल्यास 8956660290 हा हेल्पलाईन क्रमांक आहे, अर्ज भरण्यास अडचण निर्माण झाल्यास support@ratnagiridccbank.in या मेल-आयडीवर ई-मेलव्दारे संपर्क साधावा. वरील हेल्पलाईन क्रमांक व मेल-आयडी फक्त काही तांत्रिक अडचणी (अर्ज भरते वेळी, हॉल तिकिट, मुलाखतपत्र डाउनलोड करते वेळी इत्यादी) निर्माण झाल्यास संपर्काकरिता आहे .

5. उमेदवारांने अर्ज भरतांना ज्या पदासाठी तो अर्ज करीत आहे त्या पदासाठी आवश्यक असणारी पात्रता धारण करीत असल्याची खात्री करूनच अर्ज भरावा. अपात्र अर्जाबाबत अर्जदारासोबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यांत येणार नाही.



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Regd. No. Rtn/Bank/ 1427 dt. 1-7-83

6. सदर भरती प्रक्रीये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरती प्रक्रियेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

विविध श्रेणीतील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज विहीत नमुन्यात सादर करण्यासाठीची पात्रता, निकष व इतर तपशिल खालील प्रमाणे -

**अ. शैक्षणीक अर्हता :-**

| पदनाम | पदांची संख्या | वयोमर्यादा | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक (MGR) | ३ | २५ ते ४० | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि ३ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अधिकारी पदाचा अनुभव.<br>आणि<br>उमेदवार एम.एस.सी.आय.टी. किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेचे किमान 90 दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र प्राप्त असावा.<br>**विशेष अर्हता प्राधान्य-**<br>MBA / JAIIB / CAIIB / DBM / CPEC / LLB / Ph.D (यापैकी कोणतेही एक) |
| उपव्यवस्थापक (Dy. MGR) | ६ | २५ ते ४० | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि २ वर्षाचा बँकिंग क्षेत्रातील अधिकारी पदाचा अनुभव.<br>आणि<br>उमेदवार एम.एस.सी.आय.टी. किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेचे किमान 90 दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र प्राप्त असावा.<br>**विशेष अर्हता प्राधान्य-**<br>MBA / JAIIB / CAIIB / DBM / CPEC / LLB / GDC & A / HDCM (यापैकी कोणतेही एक) |
| लिपिक (Clerk) | १३१ | २१ ते ४० | उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>आणि<br>उमेदवार एम.एस.सी.आय.टी. किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेचे किमान 90 दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र प्राप्त असावा.<br>**विशेष अर्हता प्राधान्य -**<br>इंग्रजी आणि मराठी टंकलेखन परीक्षा पास केल्याचे प्रमाणपत्र / GDC & A / HDCM |
| शिपाई (Peon) | ३९ | १८ ते ४० | उमेदवार 10 वी पास असावा. |



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Regd. No. RTN/BNK/ 1427 dt. 1-7-83

1. दिनांक ०१/०८/२०२४ रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त तसेच मुळ कागदपत्र असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.
2. उपरोक्त श्रेणीनिहाय रिक्त पदांची संख्या कमी किंवा पदांच्या संख्येत वाढ करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे. तसेच सदर भरती प्रक्रीया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करण्याचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.
3. निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक सक्षमतेचे शासकीय वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. उमेदवारास रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी बँकेच्या रत्नागिरी जिल्हयातील कोणत्याही शाखेमध्ये, क्षेत्रीय कार्यालयामध्ये अथवा प्रधान कार्यालय येथे नियुक्ती देण्यांत येईल नियुक्तीचे ठिकाणी उमेदवारास 10 दिवसाचे आत रूजू होणे आवश्यक राहील.
5. सद्यस्थितीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सेवेत कार्यरत असलेला कर्मचारी वरिष्ठ पदासाठी असणारी **अर्हता** धारण करीत असेल व तो त्या पदासाठी उमदेवारी अर्ज करणार असेल त्यांचेसाठी वयाची मर्यादा ५ वर्षासाठी शिथिल करणेत येईल.

## ब. वेतनश्रेणी

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यवस्थापक (MGR) | 860 | 65 | 1185 | 85 | 1610 | 105 | 2135 | 140 | 2835 | 180 | 3735 | 230 | 4885 | 300 | 5785 | 350 | 6485 | 35 वर्षे |
| | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 3 | | 2 | | |
| उप व्यवस्थापक (Dy.MGR) | 730 | 50 | 980 | 65 | 1305 | 90 | 1755 | 120 | 2355 | 155 | 3130 | 205 | 4155 | 270 | 4965 | 300 | 5565 | 35 वर्षे |
| | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 3 | | 2 | | |
| लिपिक (Clerk) | 435 | 35 | 785 | 50 | 1035 | 65 | 1360 | 80 | 1760 | 130 | 2410 | 170 | 3260 | 210 | 3890 | 250 | 4390 | 40 वर्षे |
| | | 10 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 3 | | 2 | | |
| शिपाई (Peon) | 380 | 20 | 580 | 25 | 705 | 35 | 880 | 50 | 1130 | 60 | 1430 | 100 | 1930 | 160 | 2410 | 200 | 2810 | 40 वर्षे |
| | | 10 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 5 | | 3 | | 2 | | |

| श्रेणी | सुरवातीचा पगार (सर्व भत्यासह ) |
|---|---|
| व्यवस्थापक (MGR) | 43204/- |
| उप व्यवस्थापक (Dy.MGR) | 36674/- |
| लिपिक (Clerk) | 21855/- |
| शिपाई (Peon) | 19090/- |



Dist. Central Co-op. Bank Ltd. Regd. No. Rtn/Bank/ 1427 dt. 1-7-83

**क. निवड कार्यपध्दती :-**

**1. ऑनलाईन परिक्षा :-**

विविध श्रेणीतील पदांकरीता ऑनलाईन परिक्षा घेण्यांत येईल. सदर ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षेसाठी खालील विषयाच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. गणित, इंग्रजी व इंग्रजी व्याकरण, बँकींग व सहकार, सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था, मराठी, संगणक व माहिती तंत्रज्ञान, बुध्दीमापन चाचणी. तसेच ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी असेल. मात्र इंग्रजी व इंग्रजी व्याकरण संदर्भातील प्रश्न इंग्रजी माध्यमामध्ये असतील.

**2. कागदपत्र पडताळणी व मुलाखत :-**

ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमुद पदसंख्येच्या 1:3 प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबधित मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी बँकेकडून करून घेणे बंधनकारक राहील व मुलाखतीस ऑनलाईन पध्दतीने मुलाखतपत्र उपलब्ध करून दिले जाईल. सदर मुलाखतपत्र ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावरून डाऊनलोड करावे. मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास support@ratnagiridccbank.in या मेल-आयडीवर ई-मेलव्दारे संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.

**3. कागदपत्रे पडताळणी वेळेस विहित मुळ कागदपत्रे /प्रमाणपत्रे सादर करणे.**

सदर परीक्षेच्या निकालानंतर तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| 1 | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र. (कागदपत्रे पडताळणी वेळी बँक स्तरावर नमुना उपलब्ध करून दिला जाईल.) |
| 2 | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा. |
| 3 | वयाचा पुरावा. |
| 4 | जन्माचा पुरावा. |
| 5 | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याना नमुन्यातील दाखला. |
| 6 | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा. |
| 7 | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |
| 8 | टंकलेखन प्रमाणपत्र.(असल्यास) |
| 9 | लघुलेखन प्रमाणपत्र. (असल्यास) |
| 10 | अनुभव प्रमाणपत्र. (असल्यास) |
| 11 | उमेदवाराने अर्जात उल्लेख केलेली सर्व प्रमाणपत्रे. |



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Ratnagiri Regd. No. RTG/BANK/1427 dt. 1-7-83

4. **मुलाखत :-**

कागदपत्रे पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची बँक गठीत समितीकडून मुलाखत घेण्यांत येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. सदर मुलाखत 10 गुणांची असून सदर गुणांचे भारांकन बँक धोरणानुसार असेल त्यामध्ये 10 पैकी 5 गुण संबधीत उमेदवारांच्या शैक्षणीक पात्रतेनुसार देण्यांत येतील व उर्वरीत 5 गुण मौखीक मुलाखतीसाठी देण्यांत येतील.

5. **उमेदवारांची अंतिम निवड सूची :-**

उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण यांची बेरीज करून एकूण 100 गुणांपैकी गुणानुक्रमे गुणांसह अंतिम निवडसूची व प्रतिक्षा यादी तयार करण्यांत येईल. त्याचप्रमाणे त्या श्रेणीतील पदसंख्या विचारात घेता, अंतिम निवडसूची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुणप्राप्त झाल्यास प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. **रत्नागिरी** जिल्हयातील उमेदवार, उमेदवार धारण करीत असलेली उच्च / शैक्षणीक अर्हता, अनुभव व वय याक्रमाने प्राधान्य देवून अनुक्रमे उमेदवारांची यादी मर्यादित करण्यांत येईल.

त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे / गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या विविध हुद्याच्या पदी परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल.

6. **परिविक्षाधीन कालावधी (प्रोबेशन पिरियड) :-**

निवड करण्यांत आलेल्या उमेदवारांना ६ महिन्यांसाठी परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सेवेत नेमणुक दिली जाईल. सदर उमेदवारास नेमणूकीबाबतच्या बँकेच्या स्थायी आदेशातील व सेवानियमावलीतील प्रचलित नियम, अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

**ड. परिक्षा शुल्क :-**

**ऑनलाईन** परीक्षेकरीता रु ८४७.४६+रु. १५२.५४(GST)= रु.१०००/- शुल्क आकारले जाईल. सदर परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील. उमेदवारांना परिक्षा शुल्काची रक्कम **रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी** बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये रोखीने भरणा करता येईल. इतर कुठल्याही प्रकारे परीक्षा शुल्क स्वीकारले जाणार नाही. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परिक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही. परिक्षा शुल्क रोखीने भरताना उमेदवाराने KYC संदर्भात मूळ कागदपत्राचा एक पुरावा सादर करावयाचा आहे.

**इ. ऑनलाईन परिक्षेसंदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सुचना**

1. उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यांत येईल.



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Ratnagiri
Regd. No. RTN/BNK/ 1427 dt. 1-7-83

2. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केला किंवा तो त्या पदासीठीची अर्हता धारण करीत आहे म्हणजे ऑनलाईन परीक्षेस/ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा/ नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

3. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती अंतिम समजणेत येईल.

4. उमेदवारांनी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही पदाधिकारी / अधिकारी यांचेकडून शिफारस / दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याही टप्प्यावर अपात्र घोषीत करून निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.

5. ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बँकेचे प्रधान कार्यालय रत्नागिरी येथे बोलविले जाईल. त्यावेळी उमेदवारांना सर्व मुळ कागदपत्रे घेवून हजर रहाणे बंधनकारक राहील. कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल.

6. उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा, कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

7. यापुर्वी बँकेकडे याच पदासाठी प्रत्यक्ष कागदोपत्री किंवा मेलव्दारे अर्ज केले असतील तर त्यांचे पुर्वीचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाही. त्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

8. भरती प्रक्रियेत / निवड कार्यपध्दतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी कांही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तीक स्वरूपात कळविले जाणार नाही.

9. उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पाहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत, यास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

10. उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने **रत्नागिरी** जिल्हयातील परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. मात्र परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार नजीकच्या जिल्हयातील केंद्रावरही परिक्षा घेतली जाईल. परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये घेण्यात येईल.

11. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

12. बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लीकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यांसदर्भात कोणतीही जाहीरात अगर माहिती ही बेकायदेशिर आहे असे समजण्यात यावे.

13. कांही अपरीहार्य / आपत्कालीन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे/पुढे ढकलणे, अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

14. भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद / तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

15. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी उमेदवारांना कागदपत्रे सादर करावयाची नसली तरी ज्या उमेदवाराकडे आवश्यक शैक्षणीक अर्हता असेल त्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा.



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Ratnagiri
Regd. No. RN/Bank/1427 dt. 1-7-83

३.	**ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत :-**

1.	विविध पदाकरीता बँकेच्या ratnagiridccbank.com किंवा ratnagiridccbank.in या अधिकृत संकेत स्थळावरून ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यांत येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपुर्ण प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई-मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रीक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. **सदर भरती प्रक्रीयेदरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यांत येणाऱ्या भरती प्रक्रीयेच्या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

2.	उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणीक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यांत येईल. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना कांही चुकी झाल्यास किंवा त्रुटी राहील्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

3.	उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी /छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यांत येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाचणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यांत येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यांत येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

4.	उमेदवारांना एका पदाकरिता एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रियेत अपात्र करून निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल. एका उमेदवारास विविध श्रेणीतील पदांकरिता एक एक अर्ज दाखल करता येईल.

5.	ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सुचना बँकेच्या ratnagiridccbank.com किंवा ratnagiridccbank.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर दिनांक 09/08/2024 रोजी **सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** पर्यंत खुला राहील. परीक्षा शुल्क भरणा माहिती संकेत स्थळावर अद्यावत (Update) करण्याची अंतिम दिनांक 10/08/2024 रोजी **सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** राहील.

6.	उमेदवारांना परिक्षा शुल्काची रक्कम **रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी** बँकेच्या उमेदवारांना कोणत्याही शाखेमध्ये रोखीने भरणा करता येईल. अन्य कोणत्याही मार्गाने परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. **परिक्षा**



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Ratnagiri Regd. No. RTN/BNK/ 1427 dt. 1-7-83

**शुल्क दिनांक 09/08/2024 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी** बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये रोखीने **स्विकारले जाईल.** परीक्षा शुल्क भरणा माहिती संकेत स्थळावर अद्यावत (Update) करण्याची अंतिम दिनांक 10/08/2024 **रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** राहील.

परिक्षा शुल्क रोखीने भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

**7. परिक्षा शुल्क रोखीने भरण्याबाबत खालील पद्धतीचा अवलंब करावा.**

१) संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर बँकेच्या शाखेत परीक्षा शुल्क रोखीने भरणा करण्याचे चलन प्राप्त होईल.

२)सदर परीक्षा शुल्क भरणा करण्याचे चलन प्राप्त झाल्यानंतर, परिक्षा शुल्काची रक्कम रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये रोखीने भरणा करता येईल.

३)बँकेच्या संबंधित शाखेकडून सदर चलनाचा स्क्रोल / ट्रान्झेकशन नंबर प्राप्त होईल.

४)सदर चलनाचा स्क्रोल/ ट्रान्झेकशन नंबर उमेदवाराने बँकेच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्जावर अद्यावत (Update) करावा. चलनाचा स्क्रोल/ ट्रान्झेकशन नंबर उमेदवाराने बँकेच्या संकेतस्थळावर अद्यावत (Update) केल्याशिवाय अर्ज पूर्ण होणार नाही. अश्या अपूर्ण अर्जाची कुठलीही दखल घेतली जाणार नाही.

8. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत "JPG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पाढं-या कागदावर काळया शाईच्या पेनाने स्वत: स्वाक्षरी करून स्कॅन केलेलेली "JPG/PNG" प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करून ratnagiridccbank.com किंवा ratnagiridccbank.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेली इमेजची साईज 2MB असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 2MB असावी (त्यापेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही).

9. उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वत:चे आधार कार्ड "JPG/PDF/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करून ratnagiridccbank.com किंवा ratnagiridccbank.in या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधार कार्ड स्कॅन केलेल्या ईमेजची साईज 2MB असावी.

10. उमेदवाराने **सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व सुचना (How to Apply) वाचून घ्याव्यात त्यांनतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लीक (Click) करावे.** आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करून जाहीरातीत दिलेल्या सुचनांचे अवलोकन करून ऑनलाईन अर्ज भरावा. सदर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर ऑनलाईन परिक्षा रोखीने शुल्क भरावे.

a) उमेदवारांनी त्यांचा अर्ज बँकेच्या संकेतस्थळावरून स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.

b) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःची पूर्ण माहिती हि अचूक भरावी.



Ratnagiri Dist. Central Co-op. Bank Ltd. Regd. No. RN²/BNK/ 1427 dt. 1-7-83

**11. ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम तारीख दिनांक 09/08/2024 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.**

12. ऑनलाईन परिक्षेची माहिती उमेदवारांस ई-मेल/ एस.एम.एस. व्दारे कळविण्यांत येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील, सदर माहिती पोस्टाव्दारे पाठविण्यांत येणार नाही. सदर भरती प्रक्रीये दरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी भरती प्रक्रीयेची अद्ययावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. उमेदवारास परिक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

13. मुलाखतीचे वेळी उमेदवारांनी ऑन लाईन अर्जाची व रिसिटची प्रिंट काढून मूळ कागद पत्रांसह हजर राहणेचे आहे.

वरील सर्व महत्वाच्या सूचना उमेदवारांस बंधनकारक राहतील.

**उपरोक्त पात्रता निकष व निवड प्रक्रीयेच्या निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार कार्यवाही करण्यांत येईल व तो बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.**

**स्वाक्षरीत**

**दिनांक 01/08/2024**

**ठिकाण :-** रत्नागिरी

**मुख्य कार्यकारी अधिकारी**